بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ    نَحْمَدُہٗ وَنُصَلِّی عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ    وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in    محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# तहरीक-ए-जदीदतील सहाव्या खात्याची घोषणा

# ८९व्या वर्षामधील अनुदान करणाऱ्यां उत्कृष्ठ सदस्य व जमाअतींचा उल्लेख आणि ९० वर्षाची घोषणा

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. ३-११-२०२३ स्थान मशिद मुबारक टिलफर्ड, लंडन

بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰہِ رَبِّ الْعٰلَمِیْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ۔ مٰلِکِ یَوْمِ الدِّیْنِ۔ اِیَّاکَ نَعْبُدُ وَاِیَّاکَ نَسْتَعِیْنُ۔ اِھْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِیْمَ۔ صِرَاطَ الَّذِیْنَ اَنْعَمْتَ عَلَیْھِمْ۬ غَیْرِ الْمَغْضُوْبِ عَلَیْھِمْ وَلَا الضَّآلِّیْنَ۔

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहा आणि सुरह आले-इमरानच्या ९३ व्या श्लोकाचे पठण आणि भाषांतर केल्यानंतर, हुजूर अनवर म्हणाले: या श्लोकात अल्लाहने हे स्पष्ट केले की सदाचरणाचे सर्वोच्च दर्जे तेव्हाच प्राप्त होतात जेव्हा त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी तुम्ही तुमची आवडती वस्तू खर्च करतात.

याविषयी हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) सांगतात अस्सल सदाचरण जी मोक्षपर्यंत पोहोचवते ती तुम्हाला तोपर्यंत प्राप्त होत नाही जोपर्यंत तुम्ही आपली आवडती वस्तू दान करत नाही. एका दुसऱ्या ठिकाणी म्हणालेः धनप्रेम बाळगू नका. सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतात की जोपर्यंत तुम्ही तुमच्या आवडत्या गोष्टी अल्लाहच्या मार्गात खर्च करत नाही तोपर्यंत तुम्हाला कधीही सदाचरण मिळणार नाही. ते म्हणाले की, निरुपयोगी आणि व्यर्थ गोष्टींवर खर्च करून कोणीही चांगुलपणाचा दावा करू शकत नाही. चांगुलपणाचे द्वार अरुंद आहे. त्यामुळे फालतू गोष्टींचा खर्च करून कोणीही त्यात प्रवेश करू शकत नाही हे लक्षात ठेवा. जर आवडती वस्तू खर्च केल्याशिवाय तुम्ही त्याचे प्रेम प्राप्त करू शकत नाही. यशस्वी आणि सद्गुणी होण्यासाठी असा बलीदान आणि त्रास उचलणे अपरिहार्य आहे. पवित्र पैगंबराचे सोबत काय सहजरित्या त्या शिखरापर्यंत पोहोचले, काय त्यांनी कोणत्याही प्रकारचे बलीदान दिले नाही. काय त्यांना सहज ते दर्जे प्राप्त झाले. जोपर्यंत तातपूरते दुःख सहन केले जात नाही तोपर्यंत परमेश्वराची प्रसन्नता प्राप्त होणे शक्य नाही. लक्षात ठेवा परमेश्वराशी धोका करणे शक्य नाही.

अभिनंदनीय आहेत ते लोक जे परमेश्वराची प्रसन्नता प्राप्तीसाठी हंगामी दुःखाची परवाह करत नाहीत आणि शाश्वत आनंदाला प्राप्त करून खरे श्रद्धावंत होतात. ही आहे ती वास्तविकता जी हजरत अपेक्षित मसीह यांनी आम्हाला अनुदानाविषयी सांगितली आहे. आणि जमाअत च्या प्रत्येक सदस्यावर परमेश्वराचे उपमकार आहे की ज्याने आम्हाला या विषयाला समजून त्यानुसार खर्च करण्याचे सामर्थ्य प्रदान केले.

मोठ्या संख्येने लोक आपल्या गरजा असूनही धार्मिक गरजांसाठी आपली संपत्ती देतात. अशी हजारो उदाहरणे आहेत. आज आपण पाहतो की जगाची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. विशेषतः विकसनशील देशांची आणि विकसित देशांची आता पूर्वीसारखी स्थिती नाही. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धानेही परिस्थिती बिघडली आहे. मग या देशांतील राजकारण्यांच्या भ्रष्टाचारानेही परिस्थिती बिकट केली आहे, पण असे असूनही अहमदी लोक त्यांच्या आर्थिक त्यागात पुढे जात आहेत. सांसारिक व्यक्तीच्या दृष्टीने हे समजणे कठीण आहे, परंतु ज्यांचा दृढ विश्वास आहे त्यांना हे माहित आहे की हा त्याग परमेश्वराची कृपाप्रसाद ग्रहण करण्यासाठी आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात तहरीक-ए-जदीदच्या नवीन वर्षाची घोषणा होते, त्यामुळे मी तहरीक-ए-जदीउशी संबंधित काहीं प्रसंग सादर करेन.

हजरत मुसलेह माऊद (र.ज.) यांनी जेव्हा तहरीक जदीदची घोषणा केली आणि त्या वेळी त्यांनी केलेल्या मागण्यांमध्ये महिलांच्या आर्थिक त्यागाच्या संदर्भात असे होते की, त्यांनी दागिने करू नयेत किंवा कमी दागिने करावेत. तेव्हाही आणि आजही महिलां त्याग करत आहेत. काही स्त्रिया आपले सर्व दागिने अनुदानात प्रस्तूत करतात.

पोट कापून दान करणारे गरीब लोक आहेत आणि सर्वशक्तिमान अल्लाह अनेकांवर कृपा करतो. श्रीमंत लोकांनीही धडा शिकून त्यांच्या बलिदानाचा दर्जा वाढवला पाहिजे. हजरत मुस्लेह माऊद म्हणाले की, गरीब लोक आहेत जे त्यांच्या मासिक उत्पन्नातील पंचेचाळीस टक्के देतात, परंतु श्रीमंत लोक केवळ दीड टक्के देतात. त्यामुळे या अर्थाने गरीबांच्या त्यागाचा दर्जा खूप उच्च आहे. या अर्थाने, समृद्ध लोकांनी स्वतःचे मूल्यमापन केले पाहिजे. अल्लाह कधीही कर्ज घेत नाही हे लक्षात ठेवा. पवित्र कुरआनमध्ये म्हटल्याप्रमाणे तो सातशे पटीने किंवा त्याहूनही अधिक वाढवून देतो.

हुजूर अन्वर यांनी फिजी, मलावी, टांझानिया, गिनी-बिसाऊ, नायजर यासह काही देशांमध्ये तहरीक ए जदीदच्या क्षेत्रात बलिदान दिलेल्यांची काही उदाहरणे मांडली आणि ते म्हणाले की, पहा कोठे विरोधी आम्हाला संपवण्यासाठी उत्साहित होते आणि आज

पहा जमाअत किती समृद्ध झाली आहे आणि अल्लाहने नवीन सामील होणाऱ्यांच्या हृदयात जमाअतच्या समृद्धीसाठी बलिदानाची भावना कशी निर्माण केली. अल्लाहने प्रज्वलित केलेला हा दिवा शत्रूंच्या फुंकेणे विझणार का? हवे तसे प्रयत्न करा, अपयश आणि पराजय हेच विरोधकांचे नशीब आहे आणि जगाच्या कानाकोपऱ्यात बलिदानाची उदाहरणे निर्माण करून जमाअत प्रगती करत आहे. तहरीक-ए-जदीद हजरत मुस्लेह माऊद यांनी सुरू केले कारण जमाअतच्या विरोधात सर्व बाजूंनी बंडखोरी होत होती, सरकारी अधिकारीही विरोधकांना साथ देत होते. तहरीक-ए-जदीद चा उद्देश हाच होता की प्रचार-प्रसाराच्या माध्यातून जगाच्या कानाकोपऱ्यात जमाअतला प्रसारित करावे आणि प्रत्येक देशात जमाअत ए अहमदियाचा ध्वज फडकवला पाहिजे. त्यामुळे अहमदिया जमाअतच्या माध्यमातून इस्लामचा स्वीकार करणारे हे लोक आहेत जे विश्वास, श्रद्धा आणि बलिदानाचे उदाहरण मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. घटना असंख्य आहेत, परंतु त्या सर्वांचे वर्णन येथे करता येणार नाही.

मी तुम्हाला तहरीक-ए-जदीदबद्दल तसेच त्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीबद्दल थोडे अधिक सांगतो. जमाअतच्या विरोधात चोहोबाजूंनी उपद्रव आणि संकट निर्माण होत होतो. विशेषत: अहरारने दंगली घडवण्याचे सर्व प्रयत्न केले होते आणि ते अहमदियाला पानावरून पुसून टाकतील असा नारा होता. ते कादियानचे नाव आणि निशाण पुसून टाकतील आणि कादियानला पुसून टाकतील अशी घोषणा होती. केल्याची चर्चा होती. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) ची कबर आणि पवित्र स्थानांची विटंबना करण्याचे कार्यक्रमही नियोजित करण्यात आले होते आणि त्यावेळच्या ब्रिटीश सरकारने उपद्रव संपवण्याऐवजी त्यांना पाठिंबा दिला होता. अशा परिस्थितीत, हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनी जमाअतला एक उपक्रम दिले एक चळवळ ज्यामध्ये त्यांनी आर्थिक त्यागाकडेही लक्ष वेधले. हे १९३४ मध्ये होते. ते म्हणाले की, काही वेळा बलिदान दीर्घकाळ करावे लागते आणि त्यासाठी महिला आणि लहान मुलांनीही तयार असले पाहिजे. हे केवळ पुरुषांचे काम नाही तर महिलांनीही त्यांची जबाबदारी समजून घेतली पाहिजे. त्या वेळी प्रत्येक अहमदीला ते अनिवार्य नसले तरी जमाअतने प्रामाणिकपणा आणि निष्ठेची विलक्षण भावना दाखवली. तथापि, १९३४ मध्ये त्यांनी नियमित निधीची घोषणा केली आणि सांगितले की शत्रूंच्या हल्ल्यांना आपल्याला प्रत्युत्तर द्यायचे आहे. त्या वेळी जमाअतला एक कार्यक्रम दिले, ज्यामध्ये स्वत:ला सुधारण्यासाठी आणि त्यागाचा दर्जा उंचावण्याकडे लक्ष दिले गेले होते, तसेच त्यांनी आर्थिक त्यागासाठी प्रोत्साहन दिले

होते. अल्लाहने ते अशा प्रकारे स्वीकारले की जेथे प्रचाराचे असामान्य मार्ग खुले झाले तर आजदेखील अशाप्रकारचे आदर्श आणि अनुदान पहायला मिळतात. मात्र, जिथे जिथे या लोकांनी आर्थिक त्याग केला, तिथे त्यांनी आपले जीवनही धर्मासाठी समर्पित केले. ते दूरदूरच्या देशांत प्रचार करण्यासाठी गेले आणि काहींना तुरुंगवासाचा त्रास सहन करावा लागला. हजरत मुसलेह माऊद यांनी सुरुवातीला दहा वर्षे ही चळवळ वाढवली होती. तीन वर्षांपासून ते दहा वर्षांपर्यंत. नंतर दहा वर्षे पूर्ण झाल्यावर, त्याचे आनंददायी परिणाम पाहून आणि अधिक त्याग करणाऱ्यांच्या इच्छेनुसार, ती आणखी वाढवली गेली आणि नंतर ती कायमस्वरूपी चळवळ बनली. अल्लाहच्या सहाय्यतेचे आणि मदतीचे जे दर्शन आज आपण पाहतो ते त्या आरंभीच्या लोकांच्या बलिदानाचे परिणाम आहेत ज्यांना अल्लाहने स्वीकारले होते, तरीही या चळवळीत सामील होणाऱ्या नवीन लोकांना काहीवेळा स्वप्नांद्वारे आर्थिक त्यागासाठी प्रवृत्त केले जाते. जसे की काहीं घटनांमध्ये वर्णन केले आहे. या सुरुवातीच्या त्यागकर्त्यांच्या पिढ्यांनी त्यांच्या पूर्वजांच्या त्यागाचे स्मरण ठेवावे, जिथे त्यांनी स्वतः आणि त्यांच्या वंशजांनी या बलिदानाची अखंडता चालू ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि स्वतः वर दिलेल्या आशीर्वादाचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे, त्याग केला पाहिजे.

हुजूर म्हणाले, ''प्रथम, मी तुम्हाला तहरीक ए जदीदची फळे, जी आम्ही पाहिले मांडतो. सुरुवातीला, आम्ही कादियानच्या बाहेर विस्तारत नव्हतो किंवा भारतात थोडे पसरलो होतो, परंतु आता जगातील २२० देशात मशिदींची एकूण संख्या आहे नऊ हजार तीनशेहून अधिक आहेत. मिशन हाऊसची संख्या तीन हजार चारशेच्या वर आहे. आणि आता अनेक मशिदी बांधल्या जात आहेत. शेकडो मशिदी बांधल्या जात आहेत. मिशन हाऊसही बांधल्या जात आहेत. जगात धर्मोपदेशक आणि शिक्षकांची संख्या सुमारे पाच हजार आहे. तो अजूनही वाढत आहे. अल्लाहच्या कृपेने पवित्र कुराआनचे ७७ भाषांमध्ये भाषांतरही झाले आहे. साहित्य छापले जात आहे, विविध भाषांमध्ये साहित्य अनुवादित केले जात आहे आणि त्यातून अगणित कामे केली जात आहेत ज्याची सुरुवात तहरीक-ए-जदीदच्या माध्यमातून झाली. बाकीच्या देणग्यांचाही यात समावेश असला तरी तहरीकचाही मोठा वाटा आहे.

या वर्षी वैश्विक पार्श्वभूमीवर जमाअतने १७.२० दशलक्ष पौंड अनुदान केले आहे. अलहमदुलिल्लाह. गेल्या वर्षीच्या तुलनेत ७४९ हजार पौंड अधिक आहे.

एकूण महसुलाच्या बाबतीत, पाकिस्तान व्यतिरिक्त पहिल्या दहा पक्षांमध्ये जर्मनी, युनायटेड किंगडम, कॅनडा, अमेरिका, मध्यपूर्वेतील एक जमाअत, सहाव्या स्थानावर भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, मध्यपूर्वेतील एक जमाअत, तर घाना दहाव्या स्थानावर होता.

भारतातील दहा राज्यांमध्ये केरळ प्रथम क्रमांकावर आहे, त्यानंतर तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा, जम्मू आणि काश्मीर, ओडिशा, पंजाब, बंगाल, दिल्ली आणि महाराष्ट्र आहे. स्थानिक जमाअतच्या दृष्टिने कोईंबत्तूर, कादियान, हैद्राबाद, कालिकट, मांजेरी, मेल्लापलयम, बंगलोर, कलकत्ता, करोलाई आणि केरंग.

अल्लाह या सर्व त्यागकर्त्यांच्या संपत्ती आणि विश्वासात वृद्धी करो आणि पूर्वीपेक्षा जास्त अनुदान करण्याचे सामर्थ्य देवो.

प्रार्थनेत पॅलेस्टिनच्या लोकांना लक्षात ठेवा आणि त्यांना कधीही विसरू नका. महिला आणि मुले अत्याचाराच्या चक्कीत दळत आहेत, अल्लाह त्यांची लवकर सुटका करो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ أَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔